SIDDHI PUBLICATION

# सिद्धी प्रकाशन

श्रीनगर, नांदेड.

येथे सर्व प्रकारची पुस्तके, नियतकालिके व मासिके प्रकाशित केली जातील.
पुस्तकांसाठी ISBN नंबर उपलब्ध.

संपर्क : सौ.पल्लवी लक्ष्मण शेटे मो. 9623979067




नामा पसरी मुख आनंदला तृप्त ।
कवळु पूर्णभरित हरिराज ॥ ३ ॥
निवृत्तीने सेविला कवळु हा हरि ।
तूंचि चराचरीं दिससी आम्हां ॥ ४ ॥


OUR SERVICES

- ISBN Book
- Call for paper
- International Research Journal
- Ph.D. & M.Phil Thesis Book
- E-Book
- Conference and Seminar Proceeding
- Educational Videos and Notes
- Educational Activities

G Pay PhonePe BHIM 9623979067



SIDDHI
Siddhi Prakashan

Worldwide International Inter Disciplinary Research Journal
Website : www.wiidrj.com
Menoffice Address: Director : Mr. Tejas Rampurkar, Hyderabad.
Tuljai Niwas Ramkrishna Nagar, Near Ganpati Mandir
Vasmat Road Parbhani, Maharashtra (India)
Email :shrishprakashan2009@gmail.com / siddhiprakashan674@gmail.com
Mob : +91-9623979067

ISSN 2454-7905
9 772454 790004 >



Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed) Vol. I ISSUE - CXXI Year - 10, 2 Feb. - 2025


संत साहित्य


ISSN : 2454-7905
MAH/NAN/10936/2015
SJIF 2025 - Impact Factor : 8.542


# Worldwide International Inter Disciplinary Research Journal


**(A Peer Reviewed)**


Vol. I ISSUE - CXXI Year - 10, 2 Feb.- 2025


## संतांची बंडखोर परिवर्तनवादी भुमिका














संपादक
प्रा. डॉ. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले
मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय,
नरखेड, जि. नागपूर.


**Quarterly Research Journal**

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

**ISSN: 2454 – 7905**

*SJIF Impact Factor:* **8. 542**

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

***A Peer Reviewed Referred Journal***

**Quarterly Research Journal**

**(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)**

**www.wiidrj.com**

**Vol. I ISSUE - CXXI Year – 10 02 Feb. 2025**

## :: संपादक ::

**प्रा. डॉ. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले**

मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय,

नरखेड, जि. नागपूर.

**Address for Correspondence**

**Editor in Chief : Mrs. Pallavi Laxman Shete Website: www.wiidrj.com**

Ramkrishna Nagar near Ganpati Mandir Vasmat Road Parbhani (India –Maharashtra)

**Email:** siddhiprakashan674@gmail.com / Shrishprakashan2009@gmil.com

| | | | |
|---|---|---|---|
| 20. | संत तुकारामांच्या अभंगातील आधुनिक जाणिवा | प्रा. पुरूषोत्तम एस. निर्मळ | 92 |
| 21. | संत तुकाराम यांच्या साहित्यातील अध्यात्म | प्रा. अर्जुन बंडू राठोड | 96 |
| 22. | "संतांची बंडखोर परिवर्तनवादी भुमिका" संत नामदेव | डॉ. प्रविण कोहळे | 102 |
| 23. | संत तुकारामाचे अभंग आणि सामाजिक विद्रोह | पौर्णिमा उत्तमराव अंभोरे | 106 |
| 24. | संतांची बंडखोर परिवर्तनवादी अभंगरचना | प्रा. डॉ. देशमुख सुभाष भगवान | 111 |
| 25. | संतांची बंडखोर परिवर्तनवादी भूमिका - संत गाडगेबाबा | डॉ. अनिता एकनाथ आंबोकर | 115 |
| 26. | संत महात्मा बसवेश्वर: द्रष्टा समाजसुधारक | श्रीमती रतन अंबादास कराड | 121 |
| 27. | जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज यांची बंडखोर परिवर्तनवादी भूमिका | नादरगे चंद्रदीप बालाजी | 124 |
| 28. | जगतगुरु संत तुकाराम महाराज | प्रा. डॉ. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले | 128 |
| 29. | सतं चोखामेळा | शधे अनिसा महेबबु | 132 |
| 30. | लोकशिक्षक जगद्‌गुरु संत तुकाराम | प्रा. सौ. रश्मी रमेश देसाई | 137 |

# संत तुकाराम यांच्या साहित्यातील अध्यात्म

**प्रा. अर्जुन बंडू राठोड**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठे महांकाळ, जि.सांगली पिन.४१६४०५

**प्रस्तावना**

संत सकल समाजाचे मार्गदर्शक होते, इतकेच नव्हे तर समाज सुधारकही होते. म्हणूनच त्यांनी व्यक्ती कुटुंबापासून अगदी राष्ट्र उद्धार पर्यंत महान कार्य केले आहे. त्यात ईश्वर भक्ती, अध्यात्म तसेच समाज प्रबोधन यास प्रामुख्याने स्थान होते. त्यांच्या अभंगात, साहित्यात अध्यात्म तसेच समाज प्रबोधन हा विचार निश्चितच महत्त्वपूर्ण होता. म्हणूनच या सर्व संतांनी ईश्वर भक्ती बरोबरच समाजाला महत्त्वाचे संदेश दिले. त्यांनी समाजाला जागृत करणारे साहित्य लेखन करून समाजास एक नवी दिशा दिली. त्यातील अध्यात्म हा मानव मुक्तीचा महत्त्वाचा मार्ग असल्याचेही त्यांनी स्पष्ट केलेले आहे. विशेषत्वाने संत शिरोमणी म्हणून संबोधण्यात येणारे संत तुकाराम महाराज यांनी अध्यात्माची मानव मुक्तीच्या दृष्टीने पायवाटच मोकळी केली असल्याचे म्हटले जाते. संत तुकाराम महाराज यांनी ईश्वर भक्ती आणि अध्यात्म या बाबतीत मोलाचे कार्य आपल्या अभंग आणि साहित्याच्या माध्यमातून केलेले आहे. त्याचा मागोवा या लेखाद्वारे घेण्यात आला आहे. त्यांनी ईश्वर भक्ती आणि अध्यात्म यांचे जीवनातील महत्त्व विषद करताना लोकांना सत्याचा मार्ग दाखविला.

हजारो वर्षापासून साधू संतानी परमेश्वराच्या स्वरूपाने ज्ञान प्राप्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परमेश्वराला भेटण्याचा पाहण्याचा प्रयत्न केलेला आहे. परमेश्वराना, परमेश्वर स्वरूपाचा शोध घेण्याचा प्रयत्न हा संतानी आपापल्या भाव-भावनेच्या अनुषंगाने तसेच श्रद्धेनुसार केला आहे. वारकरी पंथातल्या संतांनी केलेल्या प्रबोधनाचा मुख्य गाभा अध्यात्मिक प्रबोधनाचा आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी-भावार्थदीपिका मराठीत सांगून अध्यात्माचे भांडार सर्वांसाठी खुले केले. त्याप्रमाणेच संत तुकाराम महाराजाची श्रद्धा विट्ठलाच्या चरणी होती. त्यांनी विट्ठलाच्या भक्तीला आपले जीवन वाहिले होते. या दृष्टीने त्यांनी आपल्या गाथेच्या अभंगातून अध्यात्माचा मार्ग दाखविला. त्यातूनच त्यांच्या अध्यात्माची दिशा स्पष्ट झालेली आहे.

अनेक अभंग जगतगुरू संत तुकाराम महाराज यांनी लिहिले आहेत. तुकोबांचे अभंग म्हणजे प्रपंच आणि परमार्थाचा मनोज्ञ समन्वय घालून देणारे ते अदभूत शास्त्र आहे. मानवी विचाराच्या विविध स्तरावरून जीवनामध्ये निर्माण झालेल्या आणि होणाऱ्या विविध समस्याची चपखल आणि समाधानपूर्वक उकल करून मानवी जीवनाला परिपूर्णता प्राप्त करून देणारा तो एक सुखसंवाद आहे. याच अनुषंगाने ते विट्ठल भक्तीच्या मार्गाने जो जाईल तोच खऱ्या अर्थाने जीवनाचे सुख अनुभवेल. त्यांनी स्वतः देखील ध्यानच माझे सर्व सुख असल्याचे पुढील अभंगाद्वारे स्पष्ट केले आहे.

**सुंदर ते ध्यान उभे विटेवरी। कर कटावरी ठेवुनिया ॥ १ ॥**
**तुळशीहार गळा कासे पितांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ।। २ ।।**
**मकर-कुंडलि तळपती श्रवणी । कंठी कौस्तुभमणी विराजित ।। ३ ।।**
**तुका म्हणे माझे हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीने ।। ४ ।।**[1]

या अभंगाचा आशय असा आहे कि, विटेवर पांडुरंगाचे जे ध्यान उभे आहे ते सुंदर असून कमरेवर हात ठेविले आहेत. तुळशीचा हार गळ्यात आहे आणि कमरेला पितांबर धारण केला आहे असे हे ध्यान मला नेहमी आवडते. माशाचा आकाराप्रमाणे ज्याच्या कानात कुंडले झळकत आहेत आणि गळ्यामध्ये कौस्तुभमणी धारण केला आहे. तुकाराम महाराज म्हणतात असे हे ध्यानच माझे सर्व सुख आहे हे त्यांचे सुशोभित मुख मी आवडीने पाहीन. तुका म्हणे माझे हेंचि सर्व सुख असेही त्यांनी स्पष्टपणे भावना व्यक्त केलेल्या आहेत.

संत तुकाराम महाराज यांनी अध्यात्माच्या दृष्टीने असेही सांगितले आहे कि, देव देहात असतो, त्याची अनुभूती स्वत्वातून येते, असे म्हणून तुकोबा आपली अनुभूती सांगून प्रबोधन करतात. देव देही असून निर्देव वृथाच फिरत असतात. देव अंतर्यामी आहे, व्यर्थ तीर्थग्रामी का हिंडावे? कस्तुरी मृगाच्या नाभीत असते, ते मृग मात्र त्याचा शोध घेत वनांतरात हिंडत राहते. साखर उसात मूळ स्वरूपात असते, तसा देहामध्ये देव असतो. दुधात लोणी असते, परंतु त्याचे मंघन करणे आपल्याला माहीत नसते.  या दृष्टीने संत तुकाराम महाराज समाजाचे प्रबोधन करताना म्हणतात.

**"देही असोनियां देव । वृचा फिरतो निर्देव ।।१।।**
**देव आहे अंतर्यामी । व्यर्थ हिंडे तीर्थग्रामी ।। धृ ।।**
**नाभी मृगाचे कस्तुरी । व्यर्थ हिंडे वनांतरी ।।२।।**
**साखरेचे मूळ कस । तैसा देही देव दिसे ।।३।।**
**दुधी असता नवनीत । नेणे तयाचे मथित ।।४।।**
**तुका सांगे मूढजनां । देही देव कां पहाना ।।५।।** (अभंग ४४८२)[2]

या अभंगाचा आशय असा आहे कि, देवाचा शोध बाहेर इतरत्र, तीर्थक्षेत्री, मंदिरात, आणखी कोठे कोठे-वनात, आकाशात घेण्याऐवजी शरीरात वसलेला देव शोधावा. उदाहरणाने तुकाराम महाराज सांगतात. दुधात लोणी, उसात साखर असून दिसत नाही. त्यांचे अस्तित्त्व मात्र जाणवते. उसाची गोडी चाखताना साखरेचा अनुभव आपण घेऊ शकतो. आपले आपल्याजवळ असलेले धन आपल्याला माहीत नसते, म्हणून कस्तुरीमृगाने बाहेर सुगंधाचा शोध घेत फिरावे पण सुगंध त्याच्या स्वतः जवळ असतो. त्याला त्याचे विस्मरण झालेले आहे. तसेच माणसाचे आहे. देव स्वत्वात आहे. तो स्वत्वातच शोधावा इतरत्र शोधणे व्यर्थ असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

संत तुकाराम महाराज यांनी अध्यात्माच्या माध्यमातून जनजागृती व जनकल्याणाचा उद्देश व्यक्त केला होता. तत्कालीन परिस्थितीतील समाज व्यवस्थेत प्रस्थापितांनी केलेले अनन्वित अत्याचार आणि सत्यधर्माविषयी केलेली दिशाभूल तुकोबांना अस्वस्थ करीत होती. त्याची झळ तुकोबांना सुद्धा बसली होती. यामुळेच त्यांची जनकल्याण, जनजागृतीची तळमळ अभंगातून व्यतीत होत असे. तत्कालीन परिस्थितीतील या स्वानुभवावरून तुकोबांच्या अध्यात्माला-अभंगाला मानवतेचा स्पर्श झालेला होता. केवळ शब्दांची पंचरंगी कसरत करून यमकाला यमक जोडून चमत्कारिक, विस्मयकारक शब्दांची जुळवणी करावी असे तुकाराम महाराजाना कधीच वाटले नाही उलट अशा शब्दपंडितांचा त्यांनी निषेधच केला. तुकाराम महाराज यांची त्यात आंतरिक तळमळ होती. त्यांना आपल्या मनातील जनकल्याणाचा जागृतीचा भाव शब्दरूपातून व्यक्त करायचा आहे. म्हणूनच ते म्हणतात की माझ्याजवळ शब्दाशिवाय दुसरे काहीच नाही.

**"आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने। शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।।१।। ।।धृ ।।**

**शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन। शब्द वाटू धन जनलोका ।।२।।**

**तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव । शब्देची गौरव पूजा करू ।।३।।"** (अभंग ३३९६)[3]

या अभंगाचा आशय असा आहे कि, परमेश्वराचे पूजन शब्दांतच करायचे अशी भावना त्यांच्या मनात आहे. शब्द हे रत्ने आहेत. पण वेळप्रसंगी त्या शब्दांचा शस्त्रासारखा वापर करण्याची कुवत स्वतः जवळ असल्याचे ते मानतात. शब्दाप्रती असणारी तुकोबाची प्रचंड निष्ठा आणि त्यातूनच त्यांचा अभिव्यक्त झालेला मानवतेचा हृदयस्पर्शी भाव त्यांच्या शब्दातील प्रत्ययकारी सुगंध आपल्याला देतो.

संत तुकाराम महाराज यांनी समाजाच्या हितासाठीच ईश्वर भक्तीचा मार्ग निवडला होता. कारण रंजल्या गांजल्या लोकांच्या सेवेतून देवत्व प्राप्त होते. असा त्यांचा ठाम विश्वास होता. याच कारणामुळे त्यांनी असा शिरस्ता त्यांनी समाजाला घालून दिला. ईश्वर व भक्त आणि लोकसेवेचा यांचा संबंध कसा आहे या संदर्भात ते म्हणतात,

**देवाच्या संबंधें विश्व चि सोयरें। सूत्र ओढे दौरें एका एक ।।१।।**

**आहाच हें नव्हे विटायासारिखें । जीव जीवननीं देखें सामावलें । । धु. ।।**

**आणिकांचे सुख दुःख उमटे अंतरीं। एथील इतरीं तेणें न्यायें ।।२।।**

**तुका म्हणे ठसावलें शुद्ध जाती। शोमा चि पुढती विशेषता ।।३।।** (अभंग ८२६)[4]

या अभंगाचा आशय असा आहे कि, एका भगवंताशी संबंध जोडला म्हणजे संपूर्ण विश्वाशी त्यांचा संबंध येतो. सर्व अंतर्यामी ईश्वर असल्यामुळे साहजिक एकमेकांच्या प्रेमधाग्याने एकमेकांना ओढ लागते. एकमेकांचे सुख, दुःख एकमेकांना समजतात. अशा तऱ्हेचा सर्वात्म शुद्धभाव अंतःकरणात ठसला जातो.

**जेथे जातों तेथे तू गाझा सांगाती। चालविसी हातीं धरूनियां ।।१।।**

**चालों वाटे आह्मी तुझा चि आधार। चालविसी भार सर्वे माझा ।। धु. ।।**

**बोलों जातां बरळ करिसी तें नीट। नेली लाज धीट केलों देवा ।।२।।**

**अवघे जन मज जाले लोकपाळ । सोइरे सकळ प्राणसखे ।।३।।**

**तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । जालें तुझें सुख अंतर्बाहीं ।।४।।** (अभंग २०००)[5]

या अभंगाचा आशय असा आहे कि, संत तुकाराम महाराज म्हणतात मी ज्या ज्या ठिकाणी जातो त्या त्या ठिकाणी तुझी अखंड सोबत असते. संसार आणि परमार्थाच्या वाटेवरती तुझाच आधार आहे. तुच माझा सर्वभार सांभाळतोस एवढेच नाही तर तुझ्या कृपा प्रसादाने लाज सोडून धीट बनलो. शत्रू व मित्र अवघे जन सोयरे बनले असून अंतर्बाह्य सुख उपभोगण्याचे भाग्य माझ्या वाट्याला आले आहे. भक्तीच्या आधाराने ईश्वर प्राप्त झाला म्हणजे ऐहिक जीवनातील दुःख, वेदना शिल्लकच राहत नाहीत. ईश्वर हाच सांगाती, सखा, सोयरा, सोबती असतो. ईश्वराच्या अस्तित्वाच्या सहवासामुळे जीवनातील दुःख, वेदना काहीच शिल्लक राहत नाहीत. अशाप्रकारचे अध्यात्म त्यांच्या अभंगातून व्यतीत झालेले पहावयास मिळते.

समाजात योगी म्हणून वावरणाऱ्या ढोंगी लोकांवर तुकारामांनी प्रखर हल्ला केला होता. पण त्याबरोबरच खऱ्याखुऱ्या योगाची एक कसोटीही त्यांनी सांगितली आहे. क्षमा हे योगाचे भाग्य असते, याचा अर्थ क्षमाशीलता हीच योगाची खरी कसोटी असते. म्हणून ज्याला योगी बनायचे असेल, त्याने अगोदर इंद्रियदमन केले पाहिजे. इंद्रियांचे दमन करायचे, याचा अर्थ इंद्रियदमनाचे ढोंग करायचे असाही नाही आणि सर्व प्रकारचे सुखोपभोग सोडून संन्यास घ्यायचा असाही नाही, हे तुकारामांनी वेळोवेळी स्पष्ट केले आहे. इंद्रियदमन करणे याचा अर्थ

उचित असा संयम बाळगणे, विषयोपभोगांच्या आहारी न जाणे, स्वैराचार न करणे, असा आहे. संत तुकाराम महाराज म्हणतात माणसाच्या जीवनात योगमार्ग हा शांती, सुख आणि समाधानासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या मते योगियांची संपत्ती ही केवळ भक्ती आहे. हा मानवी जीवनातील एक महत्त्वाचा भाग आहे. योगी ही संकल्पना स्पष्ट करीत तुकाराम महाराज म्हणतात-

**'योगियाची संपदा त्याग आणि शांति। उभयलोकी कीर्ति सोहळा मान ॥१॥**

**येरयेरांवरी जयाचे उसणे। भाग्यस्थळी देणे झाडावेसी ।।२।।**

**केलिया फावला ठायीचा तो लाहो। तृष्णेचा तो काहो काहावितो ।।३।।**

**तुका म्हणे लाभ अकर्तव्या नांवे । शिवपद जीवे भोगिजेल ॥४।।** (अभंग ८१३)[6]

या अभंगाचा आशय असा आहे कि, अर्थात, योग्याची संपत्ती त्याग व शांती आहे. त्या योगाने इहपरलोकी कीर्ति व मान यांचा सोहळा होतो. अशाप्रकारे त्यागादि संपत्तीचा मोबदला मिळाल्यामुळे एकमेकांच्या उसणवारी, देण्याघेण्याप्रमाणे होते. वैभवाच्या जागी गेला की त्यावेळी त्याचा तेथे झझराडा घेतात. मूळ स्वरूपाचा ज्याने टाहो घेतला तो प्राप्त स्थितीत घेतो. ज्याच्यामध्ये तृष्णा आहे तो त्या योगाने कष्टी होतो. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व कर्तव्य बुद्धीचा त्याग करण्यात जीवास शिवपदाच्या भोगाचा लाभ होतो.

त्यांनी ईश्वर भक्तीचे महत्त्व विषद करताना आपल्या अभंगाद्वारे म्हटले आहे कि, देवाच्या अंतरातील भाव कोणासही समजत नाही. कारण तो आपली माया समजू देत नाही. तुकाराम महाराज म्हणतात

**'विश्याचा जनिता। यशोदेसि माता ।। १ ।।**

**ऐसा भक्तांचा अंकित । लागे तैसी लावी प्रीव ॥ २ ॥**

**निष्काम निराळा । गोपी लाविवेल्या चाळा ॥ ३ ॥**

**तुका म्हणे आले । रूपा अव्यक्त चांगले ॥ ४ ॥** (अभंग ७८)[7]

तुकाराम महाराज म्हणतात, विश्व निर्माण करणारा परमात्मा सामान्य यशोदेला आई म्हणतो. प्रमाणे हा भक्तांचा अंकित आहे. जशी भक्तांमध्ये त्याच्याविषयी प्रिती असेल तशी तो देव आपल्यामध्ये भक्तांविषयीचे प्रेम ठेवतो, जो परमात्मा सर्व कामनारहित आणि सर्व उपाधीहून वेगळा असूनही त्याने आपल्याविषयीचा छंद गोपिकांना लाविला. तुकाराम महाराज म्हणतात, अव्यक्त परमात्मस्वरूप उत्तम साकार रूप धारण करते झाले.

संत तुकाराम महाराज यांच्या अध्यात्माचा गाभा ईश्वर भक्तीच्या रूपाने साहित्यातून प्रकट झालेला दिसून येतो. त्यांच्या अभंगाद्वारे याची प्रचीती येत. त्यांच्या मते या जगामध्ये सर्वत्र ईश्वर भरून आहे. चारी वेदांचे सारही नारायणाने विश्व व्यापले आहे असे सांगतात. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी सर्वत्र जनार्दनांचे वास्तव्य आहे असे संत बोलतात. ज्याप्रमाणे सूर्य कोणत्याही रसामध्ये लिप्त होत नाही. त्याचप्रमाणे माझा ईश्वर जगतात असंगपणे खेळ खेळत आहे.

**जेथें तेथें देखें तुझीच पाउलें । त्रिभुवन संचलें विठ्ठला गा ।।**

**भेदाभेद मतें भ्रमाचे संवाद। आम्हा नको वाद त्यार्शी देऊ ।।**

**तुका म्हणे अणु तुजविण नाहीं । नभाहुनि पार्टी वाड आहे ।।** (अभंग ३७)[8]

या अभंगाचा आशय असा आहे कि, विठ्ठला, सर्वत्र सर्वव्यापी तुझे स्वरूप जाणवते तुझ्या स्वरूपाने हे त्रिभुवन व्यापले आहे. भेद-अभेदाविषयीचे संवाद भ्रमातील आहेत. त्यांच्याविषयी वाद करण्याचा प्रसंग येऊ

देऊ नकोस, तुझ्या स्वरूपाच्या अज्ञानामुळे वाद निर्माण होत असतात. ज्यामध्ये तुझे वास्तव्य नाही असा एकही परमाणू नाही. तू आकाशापेक्षाही मोठा आहेस. तुझ्या अस्तित्वा विषयीचा वाद निरर्थकच आहे. या सृष्टीतील अणू-रेणूमध्ये तूच आहेस. उपरोक्त अभंगातून संत तुकाराम सर्व चराचरास ईश्वरमय करतात. अणू-रेणू म्हणजेच ईश्वर हे त्यांचे सर्वेश्वरवादी विचार आहेत.

संत तुकाराम महाराज यांच्या अध्यात्मिक मार्गाचा खरा उद्देश म्हणजे समाजाला कर्मकांडातून मुक्त करून खऱ्या भक्तीचा, सदाचाराचा, नैतिकतेचा आणि चारित्र्याचा प्रसार करणे हे होते. या हेतूने त्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय ठरवून संत तुकारामांनी आपल्या अभंगातून, अध्यात्मिक मार्गाच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन केले. संत तुकाराम महाराजांच्या अगोदरच्या काळात ईश्वराचे कोणते स्वरूप होते ? त्यांच्या काळात लोक अनेक देवदेवतांची पूजा, वृत्तवैकल्ये करत असत. धर्माच्या व देवाच्या नावावर बळी प्रथेची अघोरी पद्धत बळावत होती. त्याचा अगदी परखड शब्दात तुकारामांनी समाचार घेतला. या संदर्भात ते म्हणतात,

**नव्हे जाखाई जोखाई। मायराणी मेसाबाई ।।१।।**

**बळिया माझा पंढरिराव जो या देवांचा ही देव ।। घ्रु. ।।**

**रंडी चंडी शक्ति । मद्यमांस भक्षिती ।।२।।**

**बहिरव खंडेराव । रोटीसुटीसाटीं देव ।।३।।**

**गणोबा विक्राळ । लाडुमोदकांचा काळ ।।४।।**

**मुंज्या हौसासुरें । हें तों कोण लेखी पोरें ।।५।।**

**वेताळे फेताळें । जळो त्यांचें तोंड काळें ।।६।।**

**तुका म्हणे घिर्ती । धरा रखुमाईचा पती ।।७।।** (अभंग २३८४)[9]

संत तुकाराम महाराजांच्या काळी खऱ्या देवाचे स्वरूप न ओळखता नाना प्रकारच्या क्षुद्र देवतांची उग्र व कामिक उपासना लोक करीत असत. देवाच्या, धर्माच्या भक्तीच्या नावावर वाटेल तसा अनाचार करण्यास भोंदू गुरू व त्यांचे भगतगण प्रवृत्त झालेले होते. त्यांच्या मते जोखाई, रंडी, चंडी यासारख्या क्षुद्र देवतांना मांसांचा व रक्ताचा नैवेद्य दाखविण्याची अघोरी पद्धत बळावत होती. शक्तीच्या उपासकांत वाममार्गाचे प्राबल्य होत होते. मांस, मद्य असे घाणेरडे प्रकार परमार्थाच्या क्षेत्रात शिरून धुडगूस घालत होते. बहिरोबा, खंडोबा, मुंजाबा, म्हैसासूर या किरकोळ देवांचे माहात्म्य वाढत होते. खऱ्या देवाचे स्वरूप कुणासच पटत नव्हते. व्यावहारीक लाभासाठी लोक या क्षुद्र देवदेवतांच्या नादी लागून अनाचारास प्रवृत्त झालेले पाहून तुकोबांना त्याची किव आली आणि त्यांनी कडक शब्दांत त्याचा निषेध केला आहे. देवांचाही जो देव पंढरीनाथ त्याला प्रेमाने भजावे असा त्यांचा उपदेश त्यांनी वरील अभंगाद्वारे केलेला दिसून येतो.

संत तुकाराम महाराजांच्या अध्यात्माचे मुळ पांडुरंगाच्या नामस्मरणात होते. ते लोकांना देखील पांडुरंगाचे नामस्मरण करण्याचा उपदेश करीत असत. त्यांच्या कीर्तनातून, अभंगातून ते पांडुरंग मनामध्ये ठेवा, सतत स्मरण करा. त्यामुळेच तुम्ही भवसिंधू तरून जाल. असे म्हणत असत. संत तुकाराम महाराजांनी विठ्ठलालाच आपले सर्वस्व मानले होते. किंबहुना ते कधीच विठ्ठलाला विसरत नाही. उलट ते म्हणतात की,

**"हे चि दान देगा देवा ।**

**तुझा विसर न व्हावा ।।१।।"**

**(अभंग २३०६)**[10]

या अभंगाचा आशय असा आहे कि, देवा मला असे दान दे की ज्यामुळे मला कधीच तुझा विसर होऊ देऊ नको, म्हणजेच देव, विठ्ठल सतत माझ्या स्मरणातच राहू दे. असे त्यांना वाटते. विठ्ठलाचे नामस्मरण करत रहाणे हेच त्यांचे सर्वस्व झालेले आहे. एक क्षणही वाय न घालवता विठ्ठलाचे स्मरण करावे. आपल्यावर कितीही दुःखाचे डोंगर कोसळले तरी विठ्ठलाचा विसर पडूच नये असे त्यांना वाटत असल्याचे दिसून येते.

**समारोप**

सतराव्या शतकामध्ये सामाजिक प्रबोधनाचे मुहूर्तमेढ रोवणारे सुधारक संत म्हणून तुकाराम महाराजांचा उल्लेख केला जातो. संत तुकाराम महाराजांनी जनसामान्यांना अध्यात्माच्या माध्यमातून अर्थ सांगून ईश्वर भक्तीचा सुगम मार्ग दाखवला. वारकरी संप्रदायाची अखंड परंपरा त्यांनी निर्माण केली. संत तुकाराम हे समाजाच्या धार्मिकदृष्ट्या पडत्या काळातील लोकसंत होते. बहुजन समाजाला जागृत करून देवधर्म यासंबंधी मते लोकांना पटवून देण्यामध्ये ते यशस्वी ठरले. देव धर्मातील अनागोंदी त्याचप्रमाणे भोळ्या समजुती प्रयत्नपूर्वक नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. समाजमनावरील अंधश्रद्धेचा पगडा दूर करून लोकांना नवा धर्म, नवी भाषा देण्याचं काम संत तुकारामांनी केले. संत तुकारामांचे धर्मक्रांतीचे समाज प्रबोधन आजही समाजाला मार्गदर्शक ठरलेले आहे. त्यांनीच समाजाला खऱ्या अध्यात्माची ओळख करून दिली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भ सूची**


1. विष्णू नरसिंह जोग- सार्थ तुकारामाची गाथा, वरदा बुक्स, पुणे, १९८८, पृ.२
2. लाड, पु. म. -तुकारामांच्या अभंगांची गाथा, शासकीय मुद्रनालय. मुंबई, दुसरे पुनर्मुद्रण,१९९१, पृ.१५
3. विष्णू नरसिंह जोग- सार्थ तुकारामाची गाथा, वरदा बुक्स, पुणे, १९८८, पृ.१२
4. सानप, किशोर.,' तुकारामः व्यक्तित्व- कवित्व', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, तृतीय आवृत्ती, १९९८, पृ.३२
5. पटवर्धन आणि केळकर - तुकारामाच्या अभंगाची चर्चा', खंड - १, पुणे, १९२७, पृ.२२
6. विष्णू नरसिंह जोग- सार्थ तुकारामाची गाथा, वरदा बुक्स, पुणे, १९८८, पृ.२५०
7. विष्णू नरसिंह जोग- सार्थ तुकारामाची गाथा, वरदा बुक्स, पुणे, १९८८, पृ.२७
8. लाड, पु. म. -तुकारामांच्या अभंगांची गाथा, शासकीय मुद्रनालय. मुंबई, दुसरे पुनर्मुद्रण,१९९१, पृ.१७
9. विष्णू नरसिंह जोग- सार्थ तुकारामाची गाथा, वरदा बुक्स, पुणे, १९८८, पृ.२१
10. पाटील, श. त्र्यं. - संत तुकाराम महाराज विविधदर्शन' त्रिदल प्रकाशन, पुणे, २००७, पृ.६५




# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

A Peer Reviewed - Referred

Bela Nagar, Near Maroti Mandir, Taroda Kh. Nanded - 431 605 Maharashtra (India)


संतांची बंडखोर परिवर्तनवादी भुमिका

# Certificate of Publication


ISSN : 2454-7905

Indexed SJIF

Impact Factor 8.542

9 772454 790004 >


This is to certify that the review board of our research journal accepted the research paper / Article titled संत तुकाराम यांच्या साहित्यातील अध्यात्म of

Dr./Mr./Miss/Mrs. अर्जुन बंडू राठोड

it is peer reviewed and published in the Issue Vol. I ISSUE - CXXI Year - 10, 2 Feb. 2025 Special Issue

Thank You!

SIDDHI

Siddhi Prakashan

संपादक

प्रा. डॉ. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले